**सामंजस्य करार**
**करिअर कट्टा**
**आणि**
**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव (उस्मानाबाद)**

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
कार्यालय
उस्मानाबाद

**पार्श्वभूमी:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या महाविद्यालयांमध्ये "करियर कट्टा" ची स्थापना केली जाणार आहे. या पुढाकाराची महत्वपूर्ण भूमिका अशी की, महाविद्यालयातील युवकांना त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आवश्यक त्या दिशा दाखवून त्यावर मार्गक्रमण करून यश संपादन करण्यासाठी सर्वोतोपरी उचित मार्गदर्शन मिळावे याकरिता समर्पित कार्य करणे आवश्यक आहे. महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना भवितव्याविषयी गांभीर्याने विचार करण्याकरिता प्रेरित करावे, कौशल्य विकसित आत्मनिर्भर पिढी घडविणे, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास, व्यवसाय निर्मिती, व्यक्तिमत्व विकास आदी संदर्भात तज्ञ मार्गदर्शकांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे याकरीता सक्षमपणे नियोजन करून योग्य मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभी करणे अत्यावश्यक आहे. याबाबत करिअर कट्ट्याअंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव (उस्मानाबाद) यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

**पार्टी नंबर १:**

श्री यशवंत शितोळे
अध्यक्ष,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**पत्ता:**

करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ,मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२

**पार्टी नंबर २:**

प्रो. डॉ. प्रशांत चौधरी
प्राचार्य, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव (उस्मानाबाद)

**पत्ता:**

सांजा रोड, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) – ४१३५०१

**उद्देश:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांचा संयुक्त उपक्रम "करिअर कट्टा" महाविद्यालयात स्थापन करणे व या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान कारकिर्दीसाठी एकत्रित प्रयत्न करून प्रतिभावान युवक घडविणे.

या ध्येयाने प्रेरित विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे. हे सर्व उपक्रम महाविद्यालयांमध्ये राबवण्यासाठीचा सामंजस्य करार करण्यात येत आहे. याकरिता महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि महाविद्यालय परस्परपूरक भुमिका घेतील आणि त्याचे व्यापक परिणाम साधून विद्यार्थ्यांच्या स्वयंप्रकाशी कारकीर्द घडविण्यासाठी योगदान देतील.

**करिअर कट्ट्याची जबाबदारी:**

1. करिअर विषयक विविध दिशादर्शक मार्गदर्शन सत्रांचे नियोजन करणे.
2. स्पर्धा परीक्षांच्या तयारी साठी सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार करून त्यासाठी विशेष तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शन कोर्सेसची निर्मिती करून त्याचे डिजिटल कंटेंट उपलब्ध करून देणे.
3. महाविद्यालयीन युवा कौशल्याधिष्टीत विकसित व्हावे, यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करणे व मार्गदर्शक साहित्य उपलब्ध करून देणे.
4. उद्योजकता विकास करून व्यवसाय निर्मिती साठी आवश्यक माहिती पुरविणे व व्यवसाय उद्योग सुरु करण्यासाठी साहाय्य करणे.
5. २१ व्या शतकातील अत्यावश्यक कौशल्य धारण करणारा परिपूर्ण युवक घडविण्यासाठी व्यक्तिमत्व विकास संबंधित विशेष उपक्रमांचे आयोजन करणे.

**महाविद्यालयाची जबाबदारी:**

1. महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची करिअर कट्टा उपक्रमात नोंदणी करून घेणे.
2. करिअर कट्टा द्वारानिर्मित विविध कोर्सेससाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी प्रेरणा शिबीर कार्यक्रम राबविणे.
3. करिअर कट्टा ऑनलाईन कोर्सेसची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवस्था आणि मनुष्यबळाचे नियोजन करून अभ्यासक्रम नियमितपणे राबविणे.
4. करिअर कट्टाच्या विशेष अभ्यासाक्रमानिमित्त पुरविल्या जाणारे अभ्यास साहीत्य प्रवेशित विद्यार्थ्यापर्यंत पोहाचविणे.
5. करिअर कट्टाच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी महाविद्यालय परिसर, समाजमाध्यमे, आणि वर्गखोल्यांमध्ये जागृतीविषयक पुढाकार घेणे.
6. नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीबाबत वारंवार अहवाल घेऊन उपस्थितीमध्ये सातत्य राहील यासाठी प्रयत्न करणे.
7. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे स्थानिक पातळीवरची साधनसामग्री उपलब्ध करून देणे.
8. करिअर कट्टाचे उपक्रम राबविण्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र मंडळ तयार करावे.

**नियम व अटी:**

1. विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी करिअर कट्टाच्या विशेष ॲपद्वारा (MITSC App from Google Play Store) प्रक्रिया पूर्ण करून तीन वर्षांच्या कालावधीसाठी एकवेळ शुल्क रु ३६५ भरणे आवश्यक आहे. सदर शुल्कामध्ये विद्यार्थ्याने ५० कोर्सेस, सर्व उपक्रमांसाठी तसेच स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन नि:शुल्क प्रवेश.
2. महाविद्यालय अथवा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र विद्यार्थ्यांकडून परिक्षा शुल्क वगळता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणार नाही.
3. सदर सामंजस्य कराराचा कालावधी ०५ वर्षासाठी असेल.
4. या कालावधीसाठी महाविद्यालायद्वारा करिअर कट्टाचे प्रभारी प्राध्यापक सामान्यतः बदलू नये. काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास प्रभारी प्राध्यापक नियुक्त करतांना तशी अधिकृत माहिती महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र प्रशासनास प्रथम प्राधान्याने कळवावी.
5. करिअर कट्टाच्या प्रत्येक उपक्रमाची माहिती महाविद्यालयाच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांना प्राप्त होईल या दृष्टीने समाजमाध्यमावरून प्रसारित करावी. महाविद्यालयाच्या पुढाकारातून कुठलाही उपक्रम राबवीत असतांना त्याविषयी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रास तसेच करीअर कट्टाचे जिल्हा तसेच तालुका समन्वयक, प्राचार्य प्रवर्तक यांना द्यावी.
6. या सामंजस्य करारा व्यतिरिक्त इतर महत्वपूर्ण उपक्रमांचे स्वतंत्र करार असल्यास त्या योजनेचा समावेश या करारात राहणार नाही.

**न्यायालयीन कार्यक्षेत्र:**

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी **कोल्हापूर जिल्हा** न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

## दुरुस्ती व बदल :

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप विद्यार्थी हितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील. दोन्हीपैकी कोणत्याही एका पार्टीस करारमुक्त व्हायचे असल्यास तीस दिवस अगोदर लेखी सूचना घेऊन करारातून बाहेर पडता येईल.

**पार्टी नंबर १**

**श्री यशवंत शितोळे**
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**पार्टी नंबर २**

**प्रो. डॉ. प्रशांत चौधरी**
प्राचार्य,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय

प्राचार्य
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद ४१३५०१

**महाविद्यालय IQAC समन्वयक**

प्रो. डॉ. अर्चना बनाळे
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय

CO-ORDINATOR
Internal Quality Assurance Cell
Venkatesh Mahajan Sr.College,
Osmanabad

**महाविद्यालय करियर कट्टा समन्वयक**

डॉ. विनोदकुमार वायचळ
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय

समन्वयक
करिअर कट्टा
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
धाराशिव (उस्मानाबाद)

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
कार्यालय
उस्मानाबाद